# जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर
## खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
## नोंदनी क्रमांक – ई-3342/2017 दिनांक 27/11/2017

**आदेश क्र. जिखप्र/प्रमा-आरोग्य सेवा/305/2025**
**दिनांक- 3 / 09 /2025**

**प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश**

विषय- प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "आरोग्य सेवा" या शिर्षकाखाली नागपूर जिल्हयातील रामटेक, पारशिवनी व मौदा तालुक्यातील मुली व महिलांकरीता "मागेल त्याला नि:शुल्क सॅनिटरी पॅड वाटप योजना" राबविणे या कामाला प्रशासकीय मान्यता व निधी वितरण

वाचा
1. भारत सरकार खाण मंत्रालय प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) यांचे मार्गदर्शक सूचना दिनांक 15/01/2025
2. महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे शासन निर्णय क्र. डीएमएफ-0124/ प्र.क्र. 10/उद्योग-9 मंत्रालय, मुंबई-32, दि. 11 ऑक्टोबर 2024
3. मा. ना. राज्यमंत्री, वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय, कामगार महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांचे पत्र जा.क्र.रा.मं./टिप्पणी/विनिकृमपुविन्याका/219160/2025 दिनांक 22/03/2025
4. जिल्हा शल्य चिकित्सक, सर्वोपचार रूग्णालय, नागपूर यांचे पत्र जा.क्र. जिशचि/सारूना/औ.भा./प्रशा.मा. व निधी/2152-56/25 दिनांक 07/03/2025
5. मा. उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ नागपूर यांचे तांत्रिक मान्यता आदेश जा. क्र. उपसंआसे/ औभां./तां.मा/ सुधारीत-3/ सॅनिटरी पॅड/जि.श.चि. नागपूर/16273/2025 दिनांक 11/06/2025
6. मा.जिल्हाधिकारी महोदय यांचे दिनांक 03/09/2025 रोजीच्या मंजुर टिपणीनूसार

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 3 पत्रान्वये अधिष्ठाता, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत "आरोग्य सेवा" या शिर्षकाखाली नागपूर भागातील मुली व महिलांनसाठी सॅनिटरी पॅड हा प्रश्न अत्यंत अडचणीचा ठरलेला आहे. त्यामुळे निर्माण होणारे आरोग्यविषयक प्रश्न थांबविणे अत्यंत आवश्यक असून सर्व महिलांकरीता **"मागेल त्याला नि:शुल्क सॅनिटरी पॅड वाटप योजना"** अंतर्गत मोफत सॅनिटरी पॅड उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

संदर्भ क्र.4 पत्रान्वये जिल्हा शल्य चिकित्सक, सर्वोपचार रूग्णालय, नागपूर यांनी नागपूर जिल्हयातील ग्रामिण भागातील महिलांकरीता प्रायोगिक तत्वावर नागपूर जिल्हयातील रामटेक, पारशिवनी व मौदा तालुक्यातील मुली व महिलांकरीता जिल्हा खनिकर्म योजनेंतर्गत उत्तम दर्जाचे सॅनिटरी पॅड खरेदी करण्याबाबतचा अंदाजित किंमत **रू. 7,39,20,000/- (अक्षरी- रू. सात कोटी एकोणचाळिस लक्ष वीस हजार फक्त)** इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. संदर्भ क्र. 5 पत्रान्वये मा. उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ नागपूर यांनी सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

संदर्भ क्र. 4 अन्वये प्रस्तावित करण्यात आलेली योजना नागपूर जिल्हयात प्रायोगिक तत्वावर राबविणेकरीता **रू. 3,00,00,000/- (अक्षरी- रू. तीन कोटी फक्त)** इतकी रक्कम खर्च करणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. त्याचे तपशिल खालीलप्रमाणे.

